# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Economics

## Assignment

## Session: 2020 – 2021

Page No.
Date : / /

नाव : कु. चेतना राजेंद्र दामले

विषय : अर्थशास्त्र

वर्ग : B.A. भाग १ (sem 2)

महाविद्यालय : यशोदा गर्ल्स आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

E-mail ID : chetanadamle@gmail.com

मोबाईल नं. : 8177934294

What's up नं : 8177934294

2020 - 2021

Principal
Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15

Dr. M. D. Katre

SEAL

Assignment no. 1

प्र. १ला उत्पादन व्ययाचे प्रकार

उत्तर बाजारातून कोणत्याही वस्तूची किंमत त्या वस्तूच्या मागणी पुरवठ्याच्या संतुलनाने निश्चित होते. किंमत निश्चितीच्या प्रक्रियेत मागणीच्या बाजुने वस्तूची उपयोगिता प्रभावी ठरते. तर पुरवठ्याच्या बाजूने वस्तूच्या उत्पादन व्यय हा प्रभावी घटक असतो, म्हणजेच उत्पादकाच्या दृष्टीने उत्पादन व्यय हाच किंमत ठरविण्याच्या मुख्य आधार होय. म्हणून पुरवठ्याचे विश्लेषण करतांना उत्पादन व्ययासंबंधी सांगोपांग माहितीची आवश्यकता असणे आवश्यक ठरते. कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी निरनिराळ्या उत्पादक घटकांचा वापर करावा लागतो. या घटकांचा वापरासाठी जो पैसा खर्च करावा लागतो त्याचा त्याला उत्पादन व्यय असे म्हणतात. अर्थशास्त्रीय भाषेत ही संकल्पना स्पष्ट करावयाची झाल्यास असे म्हणता येईल की, "वस्तूचे उत्पादन करण्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे करावा लागणारा त्याग म्हणजेच उत्पादन परिव्यय होय." उत्पादन परिव्ययाची संकल्पना समजून घेण्यासाठी प्रथम प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष त्याग म्हणजे काय? ते समजून घेणे अनिमहत्वाचे ठरते, कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी भूमी, श्रम, भांडवल व संयोजक (संघटन) या चार मूलभूत घटकांचा कमीजास्त प्रमाणात वापर करावा लागतो. उत्पादनाचे हे घटक मागणीच्या तुलनेत दुर्मिळ असल्याकारणाने त्यांना त्यांचा मोबदला मिळण्याखेरीज ते घटक उपलब्ध होवू शकणार नाही. समजा एका कारखानदाराला कारखान्याच्या उभारणीसाठी अर्धा हेक्टर जमीन उपलब्ध हवी असेल तर त्याला ती जमीन मिळविण्यासाठी बाजारभावाप्रमाणे किंमत मोजावी लागेल. कारखानदाराने जमिनीच्या प्राप्ती

-साठी केलेला खर्च म्हणजेच प्रत्यक्ष त्याग होय.

परंतु ती जमीन कारखानदाराच्या स्वतः च्या मालकीची असल्यास पैसे खर्च न करता ती कारखान्यासाठी वापरली जाईल. हा एक प्रकारचा अप्रत्यक्ष त्याग होय. उत्पादन व्यय निश्चित करतांना हा खर्च हिशेबात घेणे आवश्यक ठरते. जी गोष्ट जमिनीची तीच गोष्ट श्रम, भांडवल व संघटन या घटकांची असते, या सर्व घटकांसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च म्हणजे प्रत्यक्ष त्याग आणि खर्च न करता उत्पादक घटकांचा केलेला वापर म्हणजे अप्रत्यक्ष त्याग होय. हा दोन्ही त्यागांची बेरीज म्हणजेच उत्पादनाचा एकूण व्यय होय.

सूत्र : उत्पादन व्यय = प्रत्यक्ष त्याग + अप्रत्यक्ष त्याग

उत्पादनकार्याला सहाय्य करणाऱ्या विविध उत्पादन साधनांवर जो खर्च करावा लागतो त्याला उत्पादन व्यय किंवा उत्पादन खर्च असे म्हणतात. उत्पादन व्यय फलन उत्पादकाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. कारण उत्पादन किती येईल यापेक्षा उत्पादनापासून नफा किती मिळेल याकडे विशेष लक्ष उत्पादकाला द्यावे लागते, नफा मिळविणे ही उत्पादकाची प्रमुख भूमिका असते. म्हणून उत्पादनव्ययाचे विश्लेषण महत्वाचे ठरत असते. उत्पादनव्ययाचा सर्वसामान्य अर्थ वस्तूच्या उत्पादनासाठी करावा लागणारा व्यय किंवा खर्च हा असतो. परंतु तात्वीकदृष्ट्या उत्पादनव्ययातील समाविष्ठ खर्च विचारात घेणे महत्वाचे आहे, उत्पादन व्ययात वस्तू निर्मितीवर आलेला प्रत्यक्ष खर्च महत्वाचा असतोच परंतु त्याचबरोबर काही अप्रत्यक्ष खर्च विचारात घेणे आवश्यक ठरते, उत्पादन व्यय हा वस्तूची किंमत निश्चित करणारा एक अतिशय व आवश्यक महत्वाचा घटक आहे. वस्तूची किंमत किती ठरते याची कल्पना उत्पादन व्य

देवू शकेल. उत्पादन व्यय वा खर्चाचा विचार करतांना उत्पादन व्ययास कालावधीची महत्वपूर्ण मर्यादा ठरते. अल्पकाळ आणि दिर्घकाळ खंडात वस्तूच्या उत्पादन व्ययात फरक पडतो. कारण अल्पकाळात फक्त बदलत्या घटकात वाढ घट शक्य होत असल्यामुळे बदलत्या घटकावर होणारा उत्पादन खर्च बदलता व्यय किंवा मुख्य खर्च ठरतो. स्थिर घटकात बदल शक्य होत नसल्यामुळे स्थीर घटकांवर होणारा स्थिर खर्च वा पूरक खर्च ठरतो. दिर्घविधीत उत्पादनाच्या स्थीर व बदलत्या घटकात बदल शक्य होत असल्यामुळे उत्पादन व्ययात घट करता येत नाही. म्हणून वस्तूला येणारा उत्पादन व्यय हा एकूण असतो.

उत्पादन व्ययाचे दोन प्रकार आहेत

१) मौद्रिक उत्पादन व्यय

२) वैकल्पीक उत्पादन व्यय

१) मौद्रिक उत्पादन व्यय :

उत्पादन व्यय हा उत्पादकाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. कारण उत्पादन किती होईल यापेक्षा उत्पादनापासून नफा किती मिळेल याकडे विशेष लक्ष उत्पादकास द्यावे लागते. पुरवठा विश्लेषणामध्ये उत्पादन व्ययाच्या विविध संकल्पनाचा वापर केला जातो. म्हणून या संकल्पनांची पुरेपूर ओळख करून घेण्यासाठी उत्पादन व्ययाच्या वर्गिकरणाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी उत्पादन व्ययाचे पुढील प्रकार सांगितले आहेत.

डॉ. मार्शल यांच्या मतानुसार मौद्रिक उत्पादन व्यय म्हणजे उत्पादकाला एखादी वस्तु तयार करण्याकरीता

जेवढा पैसा खर्च करावा लागतो तो त्या वस्तूचा मौद्रि
व्यय होय. कोणत्याही वस्तूच्या उत्पादनासाठी उत्पा
-नाचे सर्व घटक एकत्रित असून त्यांचा उपयोग करून
घ्यावा लागतो. उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये ज्या-ज्या घट
-कांचा उपयोग केला जातो त्या त्या सर्व घटकांच्या
मालकांना त्यांच्या मोबदला द्यावा लागतो. अर्थातच
दिला जाणारा हा मोबदला पैशाच्या स्वरूपामध्ये असत
अशाप्रकारे वस्तूच्या उत्पादनासाठी विविध घटकांवर
जो पैसा खर्च केला जातो. ह्या खर्चाची एकंदर बेरीज
म्हणजेच मौद्रिक उत्पादन व्यय होय. उदा. एका उत्पादक
-ला एका वस्तूचे १०० नग तयार करण्याकरीता २०,०००
खर्च आला असेल तर त्या ठिकाणी २०,००० रुपये हा
मौद्रिक उत्पादन व्यय होईल, मौद्रिक उत्पादन व्ययात
पुढील सर्व खर्चाचा समावेश होतो.

१) कच्चा मालाच्या खरेदीचा खर्च
२) श्रमीकांना दिलेले वेतन
३) भांडवलावर दिलेले व्याज
४) संघटकाचा मोबदला
५) यंत्रसामग्रीची झीज किंवा घसारा
६) सरकारी कर व विम्याचा खर्च, जाहीरातीवरील खर्च इ.
७) संघटकाचा सर्व साधारण नफा त्यावर होणारा खर्च
८) भूमीचे भाडे
९) कर्जावरील व्याज
१०) व्यवस्थापन कार्याचा मोबदला
११) उत्पादकावर आकारण्यात येणारा कर

मौद्रिक उत्पादन व्ययाचे पुढील दोन भागामध्ये वर्गीकरण केले जाते.

अ) <u>प्रत्यक्ष किंवा व्यक्त मौद्रिक व्यय :</u>

जी साधने उत्पादकाच्या मालकीची नसतात अशा साधनांना दिला जाणारा मोबदला व प्रत्यक्षपणे केलेला इतर खर्च म्हणजे प्रत्यक्ष किंवा व्यक्त उत्पादन व्यय होय. प्रत्यक्ष उत्पादन व्ययामध्ये कच्च्या मालाच्या खर्च, श्रमीकांच्या मजुरी, कर्जाऊ घेतलेल्या भांडवलाचे व्याज, यंत्राची फीज, वाहतुकीची खर्च, जाहिरात खर्च, अभिकर्त्याचे कमिशन, सरकारी कर, विम्याचा खर्च इत्यादी खर्चविषयक बाबींचा समावेश होतो.

ब) अप्रत्यक्ष किंवा अव्यक्त मौद्रिक व्यय :

जी साधने उत्पादकाच्या मालकीची असतात अशा साधनांना प्रत्यक्षपणे मोबदला द्यावा लागत नाही. परंतु हीच साधने इतरत्र गुंतवली असती तर त्यांना योग्य तो विशिष्ट मोबदला मिळाला असता, हीच गोष्ट विचारात घेवून बाजारभावाप्रमाणे त्यांच्या मोबदला ठरविण्यात येतो व त्यावरून प्रत्यक्ष उत्पादन खर्च किंवा अव्यक्त मौद्रिक व्यय काढला जातो. हा खर्च उत्पादकाला प्रत्यक्षपणे करावा लागत नाही. परंतु उत्पादनाच्या एकूण खर्च काढण्यासाठी हिशोबात घ्यावा लागतो. उदा. उत्पादकाची स्वतःची इमारत असेल तर तीचे भाडे, स्वतःच्या भांडवलाचे व्याज, स्वतः श्रम केले असेल तर त्याचा मोबदला इत्यादी घटकांचा विचार अप्रत्यक्ष किंवा अव्यक्त मौद्रिक व्ययामध्ये प्रामुख्याने करावा लागतो.

वैकल्पीक उत्पादन व्यय :

अमेरीकन अर्थशास्त्रज्ञांनी वैकल्पीक व्ययाला

आधिक प्रमाणात विशेष महत्व दिले गेले आहेत, वैक-ल्पीक व्ययालाच संधी व्यय (opportunity Cost), बदली व्यय (Transfer Cost) विस्थापीत व्यय (Displaced Cost) अशा विविध नावांनी संबोधले जाते.

प्रत्येक उत्पादन साधन वैकल्पीक (विविध) उपयोगाचे असते. परंतू एका उपयोगाकरिता ते साधन वापरले की, त्याचवेळी त्याचा दुसरा उपयोग करता येत नाही, म्हणजेच कोणतेही साधन एका उपयोगाकरीता वापरल्यानंतर इतर वैकल्पीक उपयोगांचा त्याग करावा लागतो. हा त्याग करावा लागल्यामुळे जी हानी होते ती ता विशिष्ट उपयोगाचा वैकल्पीक व्यय होय. अलिक-डच्या काळात आर्थिक व्यय हा विशेष तितका महत्वाचा राहिलेला नाही. आर्थिक व्ययापेक्षा अधिक महत्व हे वैक-ल्पीक व्ययास प्राप्त झालेले आहे. वैकल्पिक व्यय याचा अर्थ म्हणजे उत्पादक घटक ज्या विशिष्ट कार्याकरिता वापरले आहेत, त्या कार्या व्यतीरीक्त इतर कार्यात वापरले जात असतील तर इतर कार्यापैकी सर्वात जास्त मोबदला देणाऱ्या कार्यात त्यांना मिळणारा मोबदला हा ज्या कार्यात हे उत्पादक घटक वापरले आहेत त्या कार्यासाठीचा वैकल्पीक व्यय असतो. म्हणजेच एखाद्या कार्यात उत्पादक घटक वापरल्यामुळे त्यांना करावा ला-गणारा इतर कार्यातील मोबदल्याचा त्याग म्हणजेच वैकल्पीक व्यय (opportunity cost) होय.

रॉबिन्स यांच्या व्याख्यावरून वैकल्पीक व्ययाचा अर्थ स्पष्ट होतो. उत्पादनाची साधने मर्यादीत असली तरी ती साधने विविध उपयोगाची ठरतात. तशीच पर्यायी उपयोगाची असतात. परंतु साधनांचा पर्यायी म्हणून वापर करतांना मुळ उपयोगातून त्याचा त्याग करावा लागतो. याचा अर्थ असा की, एक

साधन एकाच वेळी एकाच वस्तूच्या उत्पादनात उपयोगा-
-त आणता येते किंवा एका साधनाचा मुळ उपयोगा-
-तून त्याग करून ते साधन दुसऱ्या वस्तूच्या उपयोगा-
-त आणले जाते. त्यास वैकल्पीक उपयोग वा उत्पादन
व्यय असे म्हणतात. आधुनिक काळात उत्पादन प्रणा-
-लीत वैकल्पीक व्ययाची सत्ता रूढ झाली असून
मूल्यनिर्णयात ही संकल्पना अतिशय महत्वाची व उपयुक्त-
-तापूर्ण मानली जाते कारण उत्पादनात एखादे साधन
विशेष युक्त म्हणून उपयोगात आणले जाते, विशेषयु-
-क्त उपयोग म्हणून जेव्हा साधनांचा उपयोग केला
जातो तेव्हा पहिल्या वापरामुळे उपयोगाचा त्याग
करावाच लागतो. या संकल्पनेवर वैकल्पीय व्यय
आधारीत आहे.

वैकल्पीक व्ययाच्या व्याख्या

१) डॉ. रॉबिन्स यांच्या मते, जेव्हा एका उत्पादन साधनाचा
विशेष युक्त वापर म्हणून उपयोग केला जातो तेव्हा मूळ
उपयोगाचा त्याग करावा लागतो. त्या त्यागाच्या
मोबदल्यास वैकल्पीक व्यय असे म्हणतात.

२) सॅम्युअलसन यांच्या मते, कोणतेही साधन एका उपयो-
-गाकरीता वापरल्यानंतर इतर वैकल्पीक उपयोगाचा
त्याग करावा लागतो. हा त्याग करावा लागल्यामुळे
जी हानी होते तो ती विशिष्ट उपयोगाच्या वैकल्पीक
व्यय होय.

वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, एखाद्या
कार्यात उत्पादक घटक वापरल्यामुळे त्यांना करावा
लागणारा इतर कार्यातील मोबदल्याचा त्याग या
सर्व घटकांचा वापर वैकल्पीक व्ययामध्ये करावा
लागतो.

SEAL

उदा. समजा एका शेतकऱ्याजवळ ५ एकराचे शेत आहे, त्यावर तो कापसाचे पीक घेऊन दरवर्षी खर्च वजा जाता २० हजार रुपये मिळवितो तुम्ही यावर्षी त्याला गव्हाचे पीक घेण्याचा सल्ला दिला त्यामुळे त्याने १५ हजार रुपये खर्च करून २५ हजार रुपयेचा गहू आपल्या शेतात पिकविला तुमच्या मते, यात त्याचा १० हजार रुपयेचा फायदा झाला. केवळ मौद्रिक खर्च विचारात घेतला तर तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु तो म्हणतो की यात माझा १० हजार रुपयेचा तोटा झाला. तो कसा? वैकल्पीक व्ययाचा विचार केला तर त्याचे म्हणणे अगदी बरोबर आहे. कारण की त्याला गव्हाच्या पिकापासून मिळणारे १० हजार रुपयाचे उत्पन्न मिळविण्यासाठी कापसाच्या २० हजार रुपयाच्या उत्पन्नाचा त्याग करावा लागतो. म्हणजेच या ठिकाणी त्याचा १० हजार रुपयाचा तोटा झाला. या उदाहरणातील गव्हाच्या पिकाच्या उत्पादनात मौद्रिक व्यय १५ हजार रुपये असला तरी वैकल्पीक व्यय मात्र २० हजार रुपये आहे. यावरून असे म्हणता येईल की, कोणत्याही वस्तूच्या उत्पादनाकरीता करावा लागणारा वैकल्पीक व्यय हा त्या वस्तूऐवजी निवडता येणारा दुसऱ्या वस्तूच्या त्यागाबरोबर असतो.

प्र.२१ पूर्ण स्पर्धा अर्थ व वैशिष्ट्य

उत्तर: बाजारात ग्राहक व विक्रेते किती आहेत आणि त्यांच्यातील स्पर्धा किती आहे यावरून बाजाराचे पूर्ण स्पर्धा, एकाधिकार (मक्तेदारी) व अपूर्ण स्पर्धा अशा तीन गटात वर्गीकरण केले जाते जेव्हा बाजारात असंख्य ग्राहक व विक्रेते असतात आणि त्यांची आपसात वस्तूच्या खरेदी-विक्रीसाठी स्पर्धा सुरू असते तेव्हा अशा परिस्थितीच्या बाजाराला पूर्ण स्पर्धेचा बाजार

असे म्हणतात. प्रसिद्ध जेष्ठ अर्थशास्त्रज्ञ प्रा. लिओनेल रॉबिन्स यांच्या मतानुसार, जेव्हा बाजारात वस्तूची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांची संख्या मोठी असते, सर्व विक्रेत्यांच्या वस्तू समान गुणाच्या असतात व विशिष्ट विक्रेत्याकडून वस्तू खरेदी केली पाहिजे अशी ग्राहकांची प्रवृत्ती नसते तेव्हा बाजारात आढळून येणाऱ्या अवस्थेला पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ किंवा परिपूर्ण स्पर्धा असे म्हणतात.

पूर्ण स्पर्धेच्या बाजाराची वैशिष्ट्ये :

वरील विश्लेषणाच्या आधारे पूर्ण स्पर्धेच्या बाजाराची खालील वैशिष्ट्ये सांगता येतील :

१) असंख्य ग्राहक व विक्रेते :

पूर्ण स्पर्धेच्या बाजारात असंख्य ग्राहक व विक्रेते असतात. त्यामुळे कोणताही एक ग्राहक आपली मागणी कमी-जास्त करून बाजारातील किंमतीवर प्रभाव पाडू शकत नाही किंवा कोणताही एक विक्रेता आपल्याजवळील वस्तूचा पुरवठा कमी जास्त करून किंमतीवर प्रभाव पाडू शकत नाही. कारण बाजारातील एका ग्राहकाची मागणी किंवा एका विक्रेत्याचा पुरवठा अल्प असतो की जणू काही समुद्रातील पाण्याचा एक थेंब समजला जातो.

२) एकजिनशी वस्तू :

पूर्ण स्पर्धेच्या बाजारात उत्पादीत झालेल्या व विक्रीसाठी आणलेल्या वस्तूंचे सर्व नग एकजिनशी असतात. रंग, रूप आकार, चव दर्जा इत्यादी बाबतीत

ते एकसारखे असतात व त्या वस्तूंचे सर्व नग एकमे-
-काला पूर्णपणे पर्यायी असतात.

३) मुक्त प्रवेश व निर्गमन :

कोणत्याही नवीन उद्योग संस्थांना पूर्ण स्प
-र्धेच्या बाजारात प्रवेश करण्याचे आणि बाजारातून
बाहेर पडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते.

४) बाजाराचे पूर्ण ज्ञान :

पूर्ण स्पर्धेच्या बाजारात ग्राहक आणि विक्रेत
यांना बाजारपेठेचे संपूर्ण ज्ञान असते. त्यामुळे ते
वस्तुला प्रचलित किंमतीपेक्षा जास्त किंमत देत नाही.
तसेच कोणताही विक्रेता इतर विक्रेत्यांपेक्षा अधिक
किंमतीला वस्तू विकू शकत नाही.

५) एकच किंमत :

पूर्ण स्पर्धेत एका वस्तूंच्या सर्व नगांची कि
-मत सर्वत्र समान असते व ती मागणी व पुरवठ्याव
-रून निश्चित झालेली असते.

६) उत्पादन घटकांची पूर्ण गतिशीलता :

पूर्ण स्पर्धेमध्ये भूमी, श्रम भांडवल आणि
संयोजक या उत्पादन घटकांना एका ठिकाणाहून दुसऱ्य
ठिकाणी जाण्याचे व एका व्यवसायातून दुसऱ्या व्यवसा
-यात जाण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यामुळे उत्पादन
घटकांच्या पर्याप्त वापर होतो. तसेच त्यांच्या सहज
उपलब्धतेमुळे उत्पादकाला उत्पादन करतांना अडचणी
येत नाही

७) वाहतूक खर्चाचा अभाव :

पूर्ण स्पर्धेत वाहतूक खर्च नसतो म्हणजेच वाहतूक खर्चाचा अभाव असतो या बाजारात असे गृहित धरले जाते की, उत्पादन संस्था एकमेकांच्या निकट असल्यामुळे वाहतूक खर्चात तफावत राहत नाही त्यामुळे वस्तूची किंमत सर्व ठिकाणी सारखीच राहते.

८) निर्हस्तक्षेपाचे धोरण

पूर्ण स्पर्धेमध्ये सरकारचे धोरण हे निर्हस्तक्षेपाचे असते. उत्पादन, वाहतूक व वस्तूंची किंमत निश्चितांच्या कोणत्याही प्रक्रियेत सरकारचा हस्तक्षेप नसतो.

वरील सर्व वैशिष्ट्ये अभ्यासल्यास पूर्ण स्पर्धेचा बाजार हा एक बाजाराचा आदर्श प्रकार आहे. हे लक्षात येते. पण प्रत्यक्ष बाजारात मात्र अशी स्थिती आढळत नाही. कारण पूर्ण स्पर्धेचा बाजार ही एक काल्पनिक संकल्पना आहे.

---

प्र. ३) एकाधिकार अर्थ प्रकार

उत्तर:

ज्यावेळी बाजारात वस्तूची खरेदी करणारे ग्राहक मोठ्या संख्येत असतात. परंतु विक्रेता मात्र एकच असतो. त्यावेळी त्या स्थितीला एकाधिकार किंवा मक्तेदारीचा बाजार असे म्हणतात. मक्तेदारी या शब्दाला इंग्रजीत Monopoly असा प्रतिशब्द आहे. यातील Mono म्हणजे एकच आणि poly म्हणजे उत्पादक म्हणजेच मक्तेदारीचा बाजार म्हणजेच एकाच उत्पादक असलेला बाजार होय. मक्तेदारीची चर्चा करतांना उत्पादक आणि विक्रेता यामध्ये सहसा फरक केला जात नाही. त्यामुळे मक्तेदारी म्हणजे एकच उत्पादक किंवा एकच विक्रेता असा अर्थ घेतला जातो. तसेच मक्तेदारीत उत्पादन करणारी एकच संस्था (पेढी)

असल्यामुळे ही संस्था म्हणजेच उद्योग समजला जातो.
मक्तेदारीस स्पर्धा करणारा दुसरा विक्रेता नसतो. त्यामु
संपूर्ण स्पर्धेचा अभाव असलेला बाजार म्हणजे एका
-कार किंवा मक्तेदारी अशी मक्तेदारीची सुटसुटीत
व सोपी व्याख्या केली जाते. स्पर्धेचा अभाव हा सम
असतो. स्पर्धेमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कधी
कधी स्पर्धा नाहीशी केली जाते तर कधी नैसर्गिक
अनुकूलतेमुळे तर कधी कायद्याचे पाठबळ मिळवून ही
स्पर्धा नाहीशी केली जाते. पूर्णस्पर्धेत प्रत्येक वस्तूंक
-रीता अनेक पर्यायी वस्तू आढळून येतात. परंतू म
-क्तेदारीच्या बाजारात अशी परिस्थिती नसते. एकाधि
-कार म्हणजे शुद्ध स्पर्धेच्या उलट परिस्थिती होय.
शुद्ध स्पर्धेत एका विक्रेत्याद्वारे असणारा पुरवठा
महत्वाचा नसतो तर त्याऐवजी एकाधिकारात बराच
उत्पादकाद्वारे सर्व पुरवठा केला जातो. एकाधिकारात
वस्तू एकजिनसी असतात आणि त्यांना जवळचे को
-तेही पर्याय नसतात. म्हणजेच एकाधिकारात विकल्या
जाणाऱ्या वस्तूच्या मागणीची तिरकस लवचिकता ही
शून्य असते. ह्याचप्रमाणे एकाधिकाराचे महत्वाचे ए
लक्षण या व्याख्येत अभिप्रेत आहेत ते म्हणजे फक्त
एकच उत्पादन संस्था वस्तूची विक्री करते. याचा अ
असा निघतो की, इतर संस्थांना उत्पादन क्रियेत
प्रवेश करण्यावर प्रभावी स्वरूपाची बंदी असते किंवा
एकापेक्षा जास्त संस्था असल्यास त्यांची एकच संघ
-ना असते.

मक्तेदारी हा शब्द १ इंग्रजी (Monoplay) यापासू
तयार झाला आहे. मोनो (Mono) म्हणजे एक व poly
म्हणजे विक्रेता. ज्या बाजारात वस्तूचा एकच विक्रेता
(poly) असतो. की त्याचे बाजारातील पुरवठ्यावर पूर्ण

नियंत्रण असते. अशा बाजारास मक्तेदारी म्हणतात. या बाजारात स्पर्धेचा संपूर्ण अभाव असतो व वस्तू-ला जवळचा पर्याय नसतो. स्पर्धेचा अभाव असल्या-मुळे मक्तेदारी आपल्या वस्तूची किंमत आपल्या इच्छे-प्रमाणे आकारू शकतो. म्हणून मक्तेदाराला किंमतकर्ता असेही म्हटले आहे.

मक्तेदारीचे प्रकार :

१) नैसर्गिक मक्तेदारी :

नैसर्गिक मक्तेदारी हा नैसर्गिक साधनांच्या उपलब्धतेमुळे निर्माण होते. काही प्रदेशांमध्ये नैसर्गिक साधने मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे त्या प्रदेशात मक्तेदारी निर्माण होते. त्याचप्रमाणे जुने उद्योगधंदे, जास्त भांडवल असलेले उद्योग धंद्यासाठी निवडलेली जागा अशा विविध कारणांमुळे नैसर्गिक मक्तेदारी निर्माण होते उदा. आसामचा चहा

२) सार्वजनिक मक्तेदारी :

वस्तू व सेवांच्या विक्रीचा अधिकार हा फक्त सरकारकडे असतो. तेव्हा तिला सार्वजनिक मक्तेदारी म्हणतात. या मक्तेदारीचे ध्येय नफा मिळवणे नसून जनकल्याणाचे असते. त्यामुळे यास कल्याणकारी मक्तेदा-री असेही म्हटले जाते. उदा. रेल्वे सेवा.

३) खाजगी मक्तेदारी

वस्तू व सेवांच्या विक्रीची मालकी ही केवळ खाजगी व्यक्ती किंवा खाजगी कंपनीकडे असते. तेव्हा खाजगी मक्तेदारी निर्माण होते. महत्तम नफा मिळविणे

हा त्यांचा हेतू असतो उदा. टाटा रिलायन्स उद्योग समूह इ.

४) फायदेशीर मक्तेदारी :

फायद्याच्या आधारे निर्माण झालेल्या म-क्तेदारीस फायदेशीर मक्तेदारी असे म्हणतात. काही उत्पादक आपल्या वस्तूंसाठी ट्रेडमार्क (बोध चिन्ह) वापरतात व ते चिन्ह ते सरकारकडून नोंदवून घेतात त्यामुळे त्या चिन्हाचा वापर कायद्यानुसार इतर को-णालाही करता येत नाही. त्या उत्पादकाचा तो का-यदेशीर अधिकार असतो उदा. पारले-जी.

५) साधी मक्तेदारी :

एखाद्या विशिष्ट वस्तूसाठी सर्व ग्राहकांना मक्तेदार एकच किंमत आकारतो. तेव्हा त्यास साधी मक्तेदारी म्हटले जाते. यात उपभोक्त्यांमध्ये किंमत विभेद केल्या जात नाही.

६) मूल्यभेदात्मक मक्तेदारी :

जेव्हा मक्तेदारी एकाच वस्तूसाठी वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळी किंमत आकारतो, तेव्हा त्यास मूल्यभेदात्मक मक्तेदारी म्हटले जाते. त्याला विभेदात्मक मक्तेदारी असेही म्हणतात. उदा. डॉक्टर, वकील हे आपल्या ग्राहकांकडून वेगवेगळी किंमत आकारत असतात.

७) ऐच्छिक मक्तेदारी :

जेव्हा मोठे उद्योग समूह स्वइच्छेने एकत्र येऊन व्यवसाय करीत असतात तेव्हा अशा मक्तेदारी

ऐच्छिक मक्तेदारी असे म्हणतात. हे उत्पादक कार्टेल, ट्रस्ट व्दारे एकमेकांशी बांधले जातात उदा. OPEC (oil producing and exporting contries).

प्र. ४ था रिकार्डोच्या खंड सिद्धांत

उत्तर

खंडाचे किंवा भाटकाचे सिद्धांत :

खंड म्हणजे जमीन, इमारत इ. उपभोगाबद्दल त्याच्या मालकाला दिला जाणारा मोबदला होय.

खंडाची अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या दिली आहे.

१) रिकार्डोच्या मते, "भूमिच्या एकूण उत्पादकांपैकी जो भाग भूमी पतीला भूमीच्या उपजत व अविनाशी गुणाच्या उपयोगाबद्दल दिला जातो. त्याला खंड म्हणतात.

२) मार्शलच्या मते, "भूमी व इतर निसर्गदत्त देणगी बद्दल भूमिपतीला प्राप्त होणारा मोबदला म्हणजे खंड होय."

रिकार्डोच्या खंड सिद्धांत :

डेव्हीड रिकार्डो यांनी १९ व्या शतकात प्रिन्सीपल ऑफ पोलीटिकल इकोनॉमिक्स या ग्रंथात भाटकाचा सिद्धांत मांडला. रिकार्डोंनी आपला सिद्धांत दोन प्रकारच्या लागवडीसाठी मांडला आहे.

अ) विस्तृत लागवडीत खंड

ब) सखोल लागवडीत खंड

अ) विस्तृत लागवडीत खंड : विस्तृत लागवडीतील खंड भूमी

ही गुणदृष्ट्या भिन्न असते. या वैशिष्ट्यांवर आधारीत आहे. विशिष्ट परिस्थितीत सारख्याच क्षेत्रफळाच्या परंतु भिन्न असते. या सुपीकतेच्या जमिनीवर सारख्या श्र भांडवलाच्या मात्रा लावल्या तर सीमांत जमिनीला सिमांत जमिनीपेक्षा आधीक्य स्वरूपाचे उत्पन्न मिळते त्याला खंड म्हणतात. जर भूमिवर सारख्याच श्रम भांडवलच्या मात्रा लावल्या तर सुपीक जमिनीवर जास्त व कनिष्ठ जमिनीवर कमी उत्पन्न मिळते.

देशातील फक्त सुपीक जमिनीवर लागवड करून देशातील लोकांच्या गरजा पूर्ण होत नसेल त कनिष्ठ जमीन लागवडीखाली आणली जाते. म्हणून निकृष्ट प्रतिच्या जमिनीला सिमांत जमीन म्हणतात

सिमांत भूमीपासून खंड मिळत नाही. कारण या जमिनीपासून येणारे उत्पन्न व उत्पादन खर्च सारख असते. मात्र सीमा पूर्व जमिनीला खंड मिळतो.


उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण विस्तृत लागवडीतील खंडाचे

| जमिनिचा प्रकार | उत्पादन खर्च | उत्पादन क्विंटल | ज्वारीची किंमत | एकूण उत्पन्न | खंड |
|---|---|---|---|---|---|
| सुपीक | ५०० | ६ | २५० | १५०० | १००० |
| मध्यम | ५०० | ४ | २५० | १००० | ५०० |
| कनिष्ठ | ५०० | २ | २५० | ५०० | ० |

वरील कोष्टकात ज्वारीची किंमत २५० रु. क्विंटल असून सुपीक जमीनीत क्विंटल ज्वारीचे उत्पादन होत असून १५०० रु. एकूण उत्पादन खर्च, ५०० रुपये

उत्पन्नातून आहे. सुपीक जमिनीपासून १०००रु खंड मिळतो. मध्यम जमिनीपासून ५ क्विंटल वजा केल्यास ज्वारीचे उत्पादन होत असून एकूण उत्पादन खर्च ५००रु व एकूण उत्पन्न १०००रुपये आहे. म्हणजेच या जमि-नीपासून ५००रु. खंड मिळतो. कनिष्ठ जमीनीतून २ क्विंटल ज्वारी उत्पादन होत असून उत्पन्न ५०० रुपये व खर्च ५००रुपये आहे. म्हणजेच कनिष्ठ जमीन बिनखंडी जमीन असून या जमिनीला खंड मिळत नाही.

आकृतीनुसार स्पष्टीकरण




वरील आकृतीत अक्ष अक्षावर जमिनीचा प्रकार व अय अक्षावर उत्पादन खर्च दर्शविला आहे. आकृतीत रेखांकीत केलेला भाग सुपीक जमिनीला १०००रु. खंड, मध्यम जमिनीला ५००रु खंड दर्शवित आहे तर कनिष्ठ जमिनीला खंड मिळत नाही.

सखोल लागवडीत खंड :

विशिष्ट परिस्थितीत एकाच प्रकारच्या जमिनी-वर अधिकाधिक श्रम भांडवलाच्या मात्रा लावल्या तर सीमा पूर्व मात्रेपासून सीमांत मात्रेपेक्षा अधिक स्वरुपाचे

उत्पन्न मिळते. त्याला खंड असे म्हणतात.

सखोल लागवडीत खंड भूमिच्या साठा म-
-दित असतो. या गृहीतावर आधारीत आहे. जेव्हा
एकाच प्रकारच्या जमिनीवर अधिकाधिक श्रम भांडव
-च्या मात्रा लावल्या तर नंतरच्या मात्रेपासून मिळणा
सीमांत उत्पत्ती ऱ्हास पावते. लोकसंख्येत वाढ झाल्
-मुळे अन्नधान्याचा पुरवठा वाढविण्यासाठी सखोल
लागवड केली जाते. शेतीत आऱ्हासी उत्पत्ती नियम
लागू होतो. यामुळे श्रम भांडवलाच्या नंतरच्या मात्रे
सीमांत उत्पत्ती ऱ्हास पावते.

श्रम भांडवलाच्या शेवटच्या मात्रेपासून खंड मि
नाही कारण या मात्रेपासून मिळणारे उत्पादन आणि
मात्रेचा उत्पादन व्यय समान असतो. सीमापूर्व मात्रेप
खंड मिळतो.


<u>उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण</u> : सखोल लागवडीत खंडाचे
उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण

| श्रम भांडवलाची मात्रा | उत्पादन खर्च (रू) | उत्पादन (रु) | ज्वारीची किंमत (रु) | एकूण उत्पन्न (रु) | खंड (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५००० | ६ | २५० | १५०० | १०० |
| २ | ५०० | ४ | २५० | १००० | ५०० |
| ३ | ५०० | २ | २५० | ५०० | ०० |

वरील कोष्ठकावरून स्पष्ट होते की पहिले श्र
भांडवलाची मात्रा उपयोगात आणली असता ६ क्विंटल
ज्वारीचे उत्पादन होत असून एकूण उत्पन्न १५०० रु

मिळते. १५०० रुपये उत्पन्नातून उत्पादन खर्च ५०० रु. वजा केल्यास १००० रु. पहिल्या भागेचा खंड होय. त्याच जमिनीवर श्रम भांडवलाची दुसरी मात्रा लावली असता ४ क्विंटल ज्वारीचे उत्पादन होत असून एकूण उत्पन्न १००० रु. मिळते. १०० रुपये उत्पन्नातून उत्पादन खर्च ५०० रु. वजा केल्यास ५०० रुपये हा दुसऱ्या मात्रेचा खंड होय. पुन्हा त्याच जमिनीवर तीसरी श्रमभांडवलाची मात्रा लावली असता २ क्विंटल ज्वारीचे उत्पादन होत असून एकूण उत्पन्न ५०० रुपये होते. हे उत्पन्न उत्पादन खर्चाबरोबर असल्यामुळे तिसरी मात्रा सीमांत मात्रा असून या मात्रेला खंड मिळत नाही.

<u>आकृतीनुसार स्पष्टीकरण</u>




श्रमभांडवलाच्या मात्रा

वरील आकृतीत अक्ष अक्षावर श्रम भांडवलाच्या मात्रा व अय अक्षावर उत्पादन दर्शविले आहे. पहिल्या श्रम भांडवलाच्या मात्रेपासून १५०० रुपयाचे उत्पादन होत असून यातून उत्पादन खर्च वजा केल्यास १००० रु खंड पहिल्या श्रम भांडवलाच्या मात्रेपासून मिळतो. दुसऱ्या श्रम भांडवलाच्या मात्रेपासून १००० रुपये उत्पन्न मिळत

Page No.
Date: / /

असून या उत्पन्नातून उत्पादनखर्च वजा केल्यास ५००रुप खंड दुसऱ्या श्रम भांडवलाच्या मात्रेपासून मिळतो. पहील्या व दुसऱ्या मात्रेपासून मिळणारा खंड आकृतीत रेखांकित चौकोनाने दर्शविला आहे. श्रम भांडवलाची तिसरी मात्रा ही सीमांत मात्रा होय. या मात्रेपासून मिळणारे उत्पादन व उत्पादन खर्च समान आहे. म्हणू या मात्रेपासून खंड मिळत नाही.

रिकार्डोच्या खंड सिद्धांताची गृहित परिस्थिती :

१) भूमिचा साठा मर्यादित असतो.
२) सिद्धांतात दिर्घकाळाचा विचार केला आहे.
३) भूमी ही गुणदृष्ट्या भिन्न असते.
४) सीमांत भूमी अस्तित्वात असते
५) खंड फक्त भूमिलाच मिळतो.
६) भूमीत उपजत व अविनाशी घटक असतात.
७) जमिनीच्या सुपीकतेत भिन्नता असल्यामुळे खंड मिळतो
८) लोकसंख्येत बदल होतो
९) शेतीत लवकर आऱ्हासी उत्पत्ती विषय लागू होतो
१०) प्रथम उच्च नंतर मध्यम व शेवटी निकृष्ट जमिनीवर शेती केली जाते.

SEAL

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15